' प्रेस नोट '

दिनांक ०३/११/२०२५

| | |
|---|---|
| युनिट | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती, |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | आलोसे श्री.रोहण चंद्रशेखर पाटिल, वय ३५ वर्ष, पद- कार्यकारी अभियंता वर्ग – १, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग, विभागीय कार्यालय अमरावती ह.मु.साईनगर अमरावती मुळ पत्ता – कल्पतरु नगर, अशोका मार्ग, नाशिक ता.जि. नाशिक |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३५,०००/– रु. |
| तडजोडी अंती स्विकारण्याचे मान्य केलेली लाचेची रक्कम | ४१,०००/– रु. |
| घटनास्थळ | सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग, विभागीय कार्यालय अमरावती |
| घटना ता. व वेळ | दि.०४/०९/२०२५ चे १७/३४ ते १८.०० वा. चे सुमारास. |

**थोडक्यात हकीकत :–** यातील तक्रारदार हे शासकीय कंत्राटदार असून कार्यकारी अभियंता सा.ब.विदयुत विभाग अमरावती यांचेकडून बुलढाणा जिल्हयातील इलेक्ट्रीकल काम मिळालेले होते. सदर कामाचे अंदाजपत्रक क्रमांक ९८५, १३०४, १५८ असे आहे. त्याबाबत आलोसे श्री.रोहन पाटील कार्यकारी अभियंता,सा.ब.विद्युत विभाग अमरावती यांना भेटण्याकरीता गेले असता, त्यांनी तक्रारदार यांना सांगीतले की, सदर तिन्ही काम हे एकूण १७,९४,०००/– रुपयाचे होतात तर तुम्ही मला २ टक्के प्रमाणे ३५,०००/– रुपये दया, तसेच तुम्ही बुलढाणा येथील जूने शासकीय विश्रामगृहाचे नुतणीकरण या कामाचे अंदाजपत्रक क्रमांक ९८६ ची वर्क ऑर्डर सुध्दा घेवून जा, आलोसे श्री.रोहन पाटील कार्यकारी अभियंता यांनी तक्रारदार यांचे मागील झालेले तिन कामाच्या १७,९४,०००/– रक्कमेच्या ०२ टक्के ३५,०००/– रुपये लाचेची मागणी करीत आहे. अशी लाच मागणी संबंधाने तक्रार दिली होती.

दिनांक ०४.०९.२०२५ रोजी आयोजित पडताळणी कार्यवाही दरम्यान आलोसे श्री.रोहण चंद्रशेखर पाटिल यांनी सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग, विभागीय कार्यालय अमरावती यांनी येथे तक्रारदार यांना तिन कामाचे २ टक्के प्रमाणे ३५,०००/– रुपये व वर्क ऑर्डर चे ६,०००/– असे एकूण तडजोडीअंती पंचासमक्ष ४१,०००/–रुपये लाचेची मागणी केली वरुन आज रोजी आलोसे श्री.रोहण पाटिल यांना ताब्यात घेण्यात आले असुन आरोपीविरुदध पो.स्टे. गाडगेनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकीया सुरू आहे.

सदरची कार्यवाही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र, अमरावती चे मा.पोलीस अधीक्षक, श्री.मारुती जगताप, मा.अपर पोलीस अधीक्षक, श्री.सचिन्द्र शिंदे,यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस उपअधीक्षक श्री.सुनिल किनगे, पोलीस उपअधिक्षक श्री.मंगेश मोहोड पोलीस अमंलदार युवराज राठोड, वैभव जायले, चालक गोवर्धन नाईक यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती विभागातर्फे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसमाने त्यांचे कोणतेही शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ ला.चलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क: १)मा.श्री.मारुती जगताप, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र अमरावती, मो.क्र. ९८५०४८८७८८.

२) श्री.सचिन्द्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परिक्षेत्र मो.क्र. ९७६४२१०४८५.

३) श्री.सुनिल किनगे, पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती मो.क्र. ९८२३१११९५५.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती, ललील सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती

**टोल फ्री क्रमांक** – १०६४,०७२१–२५५२३५५, मो.न. ७५१७५७१०६४.

(सुनिल विष्णु किनगे)
पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती.

Scanned with OKEN Scanner